**प्रस्तावना :- आरोग्य विभागा कडील सफाई कर्मचारी वर्गास (पुरुष व स्त्री) यांना गणवेशा करिता लागणारा कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अगिंकृत यवसाय) मुंबई यांचे उपलब्ध करणे व याकामी होणा-या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या गणवेश पात्र कर्मचा-यांना दर दोन वर्षानी प्रत्येकी २ नग (जोड) गणवेश उपलब्ध करुन दिले जातात.या अगोदर सन २०१९-२०२० या अर्थिक वर्षात गणवेश देण्यात आलेले आहेत.तथापि या वर्षी म्हणजे सन २०२३-२०२४ या अर्थिक वर्षात आरोग्य विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५,मनपा मुख्यालय,जुनी प्रशासकिय,औषध फवारणी व मार्केट विभाग येथील पुरुष व स्त्री सफाई कर्मचारी यांना गणवेश देणे कामी स्थायी आदेश प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार प्रभाग आरोग्य निरिक्षक,प्र.स.क्र.१ ते ५ यांचे दि.२२/०५/२०२३ रोजीच्या दैनंदिन प्राप्त अहवालानुसार प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथे स्वच्छता विषयक कामासाठी खालील प्रमाणे कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.क्र. | प्र.स.क्र. | पुरुष | स्त्री | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | १ | २४७ | ८१ | ३२८ |
| २ | २ | २१३ | ७७ | २९० |
| ३ | ३ | २०९ | ७६ | २८५ |
| ४ | ४ | २१५ | ७४ | २८९ |
| ५ | ५ | २३४ | १०८ | ३४२ |
| ६ | मार्केट विभाग | १७ | ५ | २२ |
| ६ | जुनी प्रशासकिय इमारत,सफाई विभाग | ७ | १२ | १९ |
| ७ | नवीन प्रशासकिय इमारत सफाई विभाग | १९ | १३ | ३२ |
| ८ | मुकादम | १४ | ०० | १४ |
| ९ | शौचालय विभाग (सिटी/पिटी) | २०६ | १०२ | ३०८ |
| १० | आरोग्य विभाग मुख्यालय | ०७ | ०० | ०७ |
| | एकूण | १३८८ | ५४८ | १९३६ |

वरिल उक्त आरोग्य विभागाकडील पुरुष व स्त्री सफाई कर्मचारी यांना गणवेश उपलब्ध होणेसाठी खालील प्रमाणे कापड मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | गणवेषाचा तपशील |
|---|---|---|
| १ | सॅनि.मुकादम | स्काय ब्ल्यु फुल शर्ट,निळी फुल पॅन्ट ६७.३३ (मनपाचे बोधचिन्हे व शिलाईसह) |
| २ | सॅनि.कामगार | खाकी हाफ शर्ट,फुल पॅन्ट ६७.३३ (मनपाचे बोधचिन्हे व शिलाईसह) |
| ३ | सॅनि.कामगार | स्कॉय ब्ल्यु काळी किनार ६ वारी साडी ६७.३३ (मनपाचे बोधचिन्हे व शिलाईसह) |
| ४ | सॅनि.कामगार (स्त्रिया साठी) | स्काय ब्ल्यु काळी किनार ९ वारी साडी ६७.३३ |
| ५ | सॅनि.कामगार(स्त्रिया साठी) | स्काय ब्ल्यु ब्लाऊज कापड ६७.३३ शिलाईसह |
| ६ | सॅनि.कामगार(स्त्रिया साठी) | स्त्रियासाठी वेस्ट क्लॉथ (१०० टक्के कॉटन) |
| ७ | सॅनि.कामगार(स्त्रिया साठी) | स्त्रियासाठी पेटीकोट (परकर १०० टक्के कॉटन) |

वरील तपशीला नुसार एकुण १९३६ इतक्या कर्मचा-यांना गणवेशाकरिता लागणारा कापड उपलब्ध करुन देणेसाठी यापुर्वी सन २०२०-२०२१या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय) यांचेकडुन मागविण्यात आले असता युनियचे पदाधिकारी यांचे समवेत सादर करण्यात आलेल्या कापडाचा नमुना त्यांचे पंसती नुसार कार्यादेश

निगर्मित करण्यात आले होते सदर कालावधीत कापडा बाबत युनियचे पदाधिकारी व कर्मचारी यांची तक्रार प्राप्त न झाल्याने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात कर्मचारी वर्गास आवश्यक असलेले कापड उपलब्ध होणेकरिता महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय) मुंबई यांनी दि.२८/०२/२०२३ रोजी सादर केलेल्या दरपत्रका नुसार आवश्यक कापडाची गणना केली असता रु.४०,२५,५९५/- इतका खर्च येत असल्याने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात कामगाराना गणवेश,गमबुट छत्र्या इत्यादी खरेदी या लेखा शिर्षका खाली रु.९० लक्ष मात्रची तरतदु करण्यात आली असुन सदर तरतुद निधी मधुन मान्सुन कालावधीत काम करणेसाठी सुरक्षा साधन म्हणुन गमबुट व रेनकोट प्राप्त होणेसाठी रु.३२,३५,७५२/- इतका खर्च झाल्याने रु.५७,६४,२४८/- इतका निधी शिल्लक आहे. कर्मचारी वर्गास कापड व शिलाई उपलब्ध होणे करिता कामगाराना गणवेश,गमबुट छत्र्या इत्यादी खरेदी या लेखा शिर्षका खाली रु.६,६२,५४७/- इतका खर्च कमी पडत असलेले रक्कम सन २०२३-२०२४ या आर्थिक स्वच्छता विषयक कामासाठी जनजागृती करणेया लेखा शिर्षका खाली रु.३५/- लक्ष मात्रची तरतद मधुन पुर्नविनियोजनासाठी प्रस्तावित करण्यात येत असुन सोबत नमुना नं.१० (नियम ३०) व सफाई कर्मचारी करिता गणवेश महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय) यांचेकडुन कापड खरेदी व शिलाईसाठी खर्च रक्कम रु.६४,२६,७९५/- इतक्या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि.२/०८/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.

आरोग्य व स्वच्छचा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथे स्वच्छता विषयक कामी कार्यरत असलेले १३८८ पुरुष व ५४८ स्त्री कर्मचारी असे दोन्ही मिळुन १९३६ कर्मचारी वर्गास महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांचेकडुन घेणेकरिता रु.४०,२५,५९५/- इतका खर्चास व रु.२४,०१,२००/- उक्त शिलाई खर्चास संबंधित कर्मचारी वर्गाच्या खातेवर जमा करणेचे काम विनानिविदा असल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** 240 **दि.** 6/08/२०२३

आरोग्य व स्वच्छचा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथे स्वच्छता विषयक कामी कार्यरत असलेले १३८८ पुरुष व ५४८ स्त्री कर्मचारी असे दोन्ही मिळुन १९३६ कर्मचारी वर्गास महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांचेकडुन घेणेकरिता रु.४०,२५,५९५/- इतका खर्चास व रु.उक्त शिलाई संबंधित कर्मचारी वर्गाच्या खातेवर जमा करणेचे काम विनानिविदा असल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, आरोग्य व स्वच्छचा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथे स्वच्छता विषयक कामी कार्यरत असलेले १३८८ पुरुष व ५४८ स्त्री कर्मचारी असे दोन्ही मिळुन १९३६ कर्मचारी वर्गास आवश्यक असलेले कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांचेकडुन घेणेकरिता रु.४०,२५,५९५/- इतका खर्चास व रु.२४,०१,२००/- उक्त शिलाई खर्च संबंधित कर्मचारी वर्गाच्या खातेवर जमा करणेसाठी विनानिविदेच्या कामास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**